राष्ट्रीय रक्त धोरण व्यवस्थित राबविणेबाबत-
रक्तावरील अतिरिक्त चाचण्या /विशेष चाचण्या/
सेवेसंबंधी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्काबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः राररसे २०१३/प्र.क्र.२२४/आरोग्य-५,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, नवीन मंत्रालय, मुंबई.
तारीख: २५ जून, २०१४.

वाचा :

१) **केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या मार्गदर्शक सूचना, पत्र क्र.एस-१२०१६/ ०१/२०१२-नॅको(एनबीटीसी), दि. १२ फेब्रुवारी, २०१४.**

२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक क्र.राररसे २०१३/प्र.क्र.२२४/आ-५, दि. १८.०६.२०१४.**

३) **संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद पत्र क्र. रारसंप/राष्ट्रीय रक्त धोरण/२०१४/४६३, दि. १९ जून, २०१४.**

## : परिपत्रक :

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे पत्र क्र.एस- १२०१६/०१/२०१२-नॅको(एनबीटीसी) दिनांक १२ फेब्रुवारी २०१४ अन्वये रक्त व रक्त घटकासाठी आकारावयाचे प्रक्रिया / चाचणी शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रक्त व रक्त घटक पुरवठा करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या सुधारित प्रक्रिया शुल्काबाबतचे परिपत्रक संदर्भ क्र.२ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

२. राज्य रक्त संक्रमण परिषदेने रक्त व रक्त घटकांची प्रक्रिया/ चाचणी शुल्कामध्ये सुरक्षित रक्तासाठी कराव्या लागणाऱ्या अतिरिक्त चाचण्या/सेवेचे मुल्यांकन करण्यासाठी एक उप समिती नेमावी असे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेमार्फत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत यापूर्वी गठीत केलेल्या सोळा सदस्यीय समितीस अतिरिक्त चाचण्या/विशेष चाचण्या मूल्यांकनासाठी नियुक्त केले होते. त्याअनुषंगाने सदर समितीने शिफारशी केल्या असून त्या शिफारशी राज्य रक्त संक्रमण परिषदेने मान्य केल्या आहेत. त्यानुसार, संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या दि.१९ जून २०१४ च्या पत्रान्वये अतिरिक्त चाचण्या/विशेष चाचण्या शुल्क रक्त व रक्त घटक निहाय विशिष्ट चाचण्या/सेवा बाबत समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासन परिपत्रक निर्गमित करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे.

३.१ Specialized test per whole blood unit and specialized test charges recommended by NBTC.

| Sr.No. | Description | Charges |
|---|---|---|
| 1 | NAT | Rs.1200/- |
| 2 | Chemiluminescence | Rs.500/- |
| 3 | IV Generation ELISA (HIV) | Rs.50/- |
| 4 | IV Generation ELISA (HBsAg) | Rs.50/- |
| 5 | IV Generation ELISA (HCV) | Rs.150/- |
| 6 | Anti HBc | Rs.250/- |
| 7 | Antibody screening (donor) | Rs.300/- |

३.२ उपरोक्त अतिरिक्त/विशेष चाचण्यावर येणाऱ्या खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

३.२.१ अतिरिक्त/विशेष चाचण्या सेवेचा खर्च ४० ते ६० टक्के या प्रमाणात Packed Red Cells वर आकारण्यात यावा.

३.२.२ उर्वरित अतिरिक्त/विशेष चाचण्या सेवेचा खर्च (४० टक्केच्या मर्यादेपर्यंत) रक्ताच्या इतर घटकांवर आकारण्यात यावा.

३.२.३ जर रक्तपेढीस वरील ३.२.१ व ३.२.२ मधील सूत्र मान्य नसल्यास अतिरिक्त/विशेष चाचण्यांच्या सेवेच्या खर्चाची तपासणी परिव्यय अंकेक्षानुसार (Cost Auditor-Institute of cost and works accounts-ICWA) यांचेकडून करून घ्यावी व प्रस्ताव राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे मान्यतेसाठी सादर करावा. असे प्रस्ताव प्राप्त झाल्यास राज्य रक्त संक्रमण परिषदेने त्याबाबत निर्णय घ्यावा.

३.२.४ अतिरिक्त/विशेष चाचणी सेवेचे दर हे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने ठरवून दिलेल्या उच्चत्तम मर्यादेत (Upper Celling) असावेत व सर्व रूग्णांना ते समान असावेत. तथापि, सबंधित रक्तपेढी सुयोग्य प्रकरणी अतिरिक्त/ विशेष चाचणी सेवेचे दर कमी करू शकेल अथवा सूट देऊ शकेल.

४.१ Specialized component specific test and admissible charges recommended by NBTC.

| Sr.No. | Test/Procedure | Charges | Applicable |
|---|---|---|---|
| 1 | Leuco filtration Red Cells | Rs.1000/- | Whole blood/ Red Cells |
| 2 | Leuco filtration Platelets | Rs.1500/- | Platelets |
| 3 | Grouping & Cross matching by automation | Rs.280/- | Whole blood/Red Cells |
| 4 | Grouping & Cross matching by semi automation | Rs.120/- | Whole blood/Red Cells |
| 5 | Phenotyping for extended Serology | Rs.500/- | Whole blood/Red Cells |
| 6 | Irradiation | Rs.1000/- | Whole blood/Red Cells/ Platelets/ Granulocytes |
| 7 | Bacterial Detection | Rs.400/- | Platelets |

४.२ जर ग्रुपींग व क्रॉस मॅचींग एकाच वेळेस स्वयंचलित (Automation) व निमस्वयंचलित (Semiautomation) पध्दतीने करण्यात येत असल्यास सदर चाचणी सेवेचा सरासरी दर रू.२००/- प्रति चाचणी एवढा आकारण्यात यावा.

५.१ Additional processing charges for blood components using Quadruple bags by buffy coat method are recommended by NBTC as follows.

| **Sr.No.** | **Description** | **Charges** |
|---|---|---|
| 1 | Red Cells | Rs.150/- |
| 2 | Platelets | Rs.150/- |
| 3 | Plasma | Rs.150/- |

५.२ अशासकीय रक्तपेढयामध्ये अफेरेसीस (Apheresis) पध्दतीने Platelet संकलित करून आवश्यक त्या सर्व चाचण्या पूर्ण करून त्याचे आकारण्यात येणारे प्रक्रिया शुल्क रू.११०००/- पेक्षा अधिक असणार नाही.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६२५१४३८५४०६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sul Dnyandeo L

Digitally signed by Sul Dnyandeo L
DN: CN = Sul Dnyandeo L, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2014.06.25 18:13:19 +05'30'

**( ज्ञा. ल. सुळ )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६. मा.मंत्री/मा.राज्य मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. प्रधान सचिव/सचिव (२) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. उप औषध नियंत्रक, वेस्ट झोन, मुंबई सेंट्रल, मुंबई.
९. धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई.
१०.अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
११.उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१२.जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१३.धर्मादाय संस्था संचलित/ खाजगी /रेड क्रॉस रक्तपेढया (सर्व)
१४.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५.निवडनस्ती/आरोग्य-५